International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# समाज माध्यमांचा भाषेवर झालेला प्रभाव: एक चिकित्सक अभ्यास

**प्रा. डॉ. निमसे हनुमंत गणपत**

*प्रमुख, मराठी विभाग व सहयोगी प्राध्यापक कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव.*

***Corresponding Author –* प्रा. डॉ. निमसे हनुमंत गणपत**

**DOI - 10.5281/zenodo.18654180**

***सारांश:***

*डिजिटल तंत्रज्ञानाच्या विस्फोटामुळे समाज माध्यमे हे आजच्या काळातील सर्वात प्रभावी संवादमाध्यम ठरले आहेत. सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक अशा सर्व क्षेत्रांमध्ये समाज माध्यमांचा प्रभाव खोलवर जाणवतो. त्यांच्या या प्रभावाने भाषावापर, लेखनशैली, शब्दसंपदा आणि संवादपद्धतीत प्रचंड बदल घडविले आहेत.प्रस्तुत शोधनिबंधात समाज माध्यमांमुळे भाषेवर होत असलेल्या सकारात्मक आणि नकारात्मक परिणामांचा चिकित्सक अभ्यास केला आहे. यामध्ये विशेषतः मराठी भाषेतील संक्षिप्तीकरण, इंग्रजी-मिश्र वापर, शुद्धलेखनाची हानी, तसेच नव्या अभिव्यक्तिपद्धतींचा उदय अशा बाबींचा अभ्यास करण्यात आला आहे. संशोधनातून असे दिसून येते की, समाज माध्यमांमुळे भाषेत लोकशाहीकरण आणि सृजनशीलता वाढली असली तरी भाषिक शुद्धता व परंपरेवर प्रतिकूल परिणामही जाणवतात. डिजिटल युगाशी सुसंगत भाषिक धोरणांची गरज या शोधनिबंधातून अधोरेखित केलेले आहे.*

## प्रस्तावना:

मानवाच्या सामाजिक जीवनात भाषेचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे. भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून संस्कृती, सभ्यता आणि ओळखीचे वहन करणारी प्रणाली आहे. २१व्या शतकात इंटरनेटसह सामाजिक माध्यमांचा प्रचंड विस्तार झाल्यामुळे मानवी संवादाची पद्धत पूर्णपणे बदलली. फेसबुक, इन्स्टाग्राम, यूट्यूब, व्हॉट्सॲप, ट्विटर (एक्स) आणि इतर माध्यमांवर दररोज अब्जावधी संदेशांची देवाणघेवाण होते. या संवादाचा प्रभाव भाषिक बांधणी, शब्द प्रयोग, रचना, लेखनपद्धती आणि भाषिक शिस्तीवर व्यापक प्रमाणात जाणवतो.भाषेतील बदल हा नैसर्गिक आणि सतत चालू राहणारा प्रक्रिया-भाग आहे. परंतु समाज माध्यमांच्या आगमनानंतर हा बदल अधिक वेगाने आणि अनियंत्रित पद्धतीने घडताना दिसतो.म्हणूनच समाज माध्यमांचा भाषेवर झालेला प्रभाव हा अभ्यासाचा महत्त्वपूर्ण विषय ठरतो.

## साहित्याचा आढावा:

भाषेवरील बदल आणि माध्यमांचा प्रभाव याविषयी अनेक अभ्यास झाले आहेत. ब्लूमफिल्ड, चॉम्स्की यांसारख्या भाषातज्ञांनी भाषिक परिवर्तन हे सामाजिक परिस्थितीशी निगडित असल्याचे म्हटले आहे. डिजिटल माध्यमांवरील अभ्यास (Tagliamonte, 2016) सुचवतो की ऑनलाईन संवादात भाषेच्या पारंपरिक संरचनेत बदल होऊन नवीन भाषिक संकल्पना उदयास येतात.भारतातील विविध भाषांवरील सोशल मीडियाचा प्रभाव अभ्यासताना काही संशोधकांनी असे नमूद केले आहे की इंग्रजी ही डिजिटल युगातील प्रभावी भाषा असल्याने देशी भाषांमध्ये इंग्रजी-मिश्र रचना वाढत चालली

आहे (कुलकर्णी, २०१९). मराठीसंदर्भातही काही संशोधनांमध्ये समाज माध्यमांमुळे भाषिक शुद्धतेत घट, व्याकरणातील दुर्लक्ष, आणि संक्षिप्तीकरणाचा अतिरेक यांचा उल्लेख केला आहे.या आधी झालेल्या संशोधनांनी समाज माध्यमे व भाषा यांच्यातील संबंध स्पष्ट केला असला तरी चिकित्सक विश्लेषणाची गरज अद्याप होती. प्रस्तुत अभ्यास ही ती पोकळी भरून काढण्याचा प्रयत्न आहे.

**संशोधन समस्या:**

समाज माध्यमांच्या वापरामुळे भाषिक पातळीवर अनेक सकारात्मक आणि नकारात्मक बदल होत आहेत. हे बदल भाषेच्या गुणवत्तेला, संस्कृतीला आणि पुढील पिढ्यांच्या भाषिक विकासाला कसे प्रभावित करतात, याचा चिकित्सक अभ्यास करण्याची आवश्यकता आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१. समाज माध्यमांचा भाषेवरील एकूण परिणाम अभ्यासणे.
२. भाषेतील सकारात्मक आणि नकारात्मक बदल ओळखणे.
३. डिजिटल संवादामुळे भाषिक शुद्धता आणि शब्दसंपदा यांच्यात झालेल्या बदलांचे विश्लेषण करणे.
४. समाज माध्यमांमुळे उदयास आलेल्या नव्या भाषिक वैशिष्ट्यांचे परीक्षण.
५. भाषेचे भविष्य आणि सुधारणा याविषयी शिफारसी करणे.

**संशोधन पद्धत:**

हा अभ्यास मुख्यतः वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक प्रकारचा आहे.उपलब्ध साहित्य, संशोधन निबंध आणि डिजिटल संवादाचे नमुने यांचे विश्लेषण करण्यात आले.सोशल मीडियावरील सार्वजनिक पोस्ट, टिप्पणी, संदेश आणि व्हिडिओ शीर्षके यांचा अभ्यास नमुन्यादाखल करण्यात आला.संशोधनासाठी गुणात्मक विश्लेषणाची पद्धत वापरली आहे.

**समाज माध्यमांचा भाषेवर झालेला प्रभाव: निरीक्षणे आणि विश्लेषण:**

**१. सकारात्मक प्रभाव:**

**(अ) लोकशाही संवादाला चालना:** समाज माध्यमांमुळे सर्वसामान्य लोकांना आपल्या भाषेतून विचार मांडण्याची संधी मिळाली. कोणत्याही सामाजिक स्तरातील व्यक्ती आपली अभिव्यक्ती जगापर्यंत पोहोचवू शकते.

**(आ) भाषेचा प्रसार आणि नवसर्जन:** खेळकर मीम्स, लघुकथा, कविता, विनोदी व्हिडिओ, पॉडकास्ट इत्यादींमुळे भाषेत सर्जनशीलतेचा उदय झाला.

नवीन पिढी स्वतःच्या शैलीत भाषेचा लवचिक वापर करताना दिसते.

**(इ) नवीन भाषिक प्रयोग आणि संक्षिप्त स्वरूप:**

डिजिटल संवादामुळे
छोटे संदेश,
इमोजी,
चिन्हे,
संक्षिप्त शब्द
यांचा वापर वाढला आहे.

उदा. “काय चललंय?”, “ओके”, “थँक्स”, "लव्ह यू", "OMG", “BRB” इत्यादी.

**ई) भाषेतील जागतिकीकरण:** इंटरनेटमुळे भाषेची देवाणघेवाण वाढून नव्या भाषिक संकल्पनांना चालना मिळाली. अनेक भाषांतील शब्द सहजपणे स्थानिक भाषेत मिसळले जात आहेत.

**२. नकारात्मक प्रभाव:**

**(अ) इंग्रजी मिश्र भाषेचा अतिरेक:** "हॅपी बर्थडे माझ्या प्यारी फ्रेंड", "मी कॉन्फिडंट नाही", "फील येतोय" सारखे वाक्यप्रयोग वाढत आहेत. यामुळे भाषेची रचना विस्कटण्याची आणि मूळ शब्दसंपदा हरवण्याची शक्यता आहे.

**(आ) शुद्धलेखनाचे नुकसान:** जलद टायपिंग, ऑटोकरेक्ट आणि इंग्रजी कीबोर्डमुळे मराठी वा इतर भाषांचे शुद्धलेखन बिघडले आहे.

उदा., "तुला काय झाल?", "मी येतय", "आपन भेटुया" अशा चुका सर्वत्र दिसतात.

**(इ) भाषिक संस्कृतीचे अध:पतन:** ट्रोलिंग, द्वेषपूर्ण टिप्पणी आणि अपशब्दांचा वापर वाढल्याने संवादाचा दर्जा खालावला आहे.

**(ई)** वाचन आणि सखोल लेखनाची घसरण समाज माध्यमांवरील स्क्रोल संस्कृतीमुळे लांब, चिंतनशील लिखाणाकडे दुर्लक्ष होते. संक्षिप्त संदेशांची सवय पारंपरिक साहित्य किंवा दीर्घ लेखन क्षमतांना बाधा आणते.

**(उ) पारंपरिक शब्दसंपदेचे लोप:** झपाट्याने इंग्रजी आणि नेट-भाषा वापरल्यामुळे मूळ शब्द किंवा भावस्पर्शी अभिव्यक्ती कमी प्रमाणात वापरात राहतात.

**चिकित्सक विश्लेषण (Critical Analysis):**

समाज माध्यमांचा प्रभाव पाहताना असे लक्षात येते की भाषेतील बदल हे द्विधर्मी आहेत. एका बाजूला सुलभ, त्वरित आणि सार्वत्रिक संवादामुळे भाषा अधिक उपलब्ध आणि गतिमान बनली आहे. दुसऱ्या बाजूला हीच गती भाषेतील शिस्त, शुद्धलेखन आणि अभिव्यक्तीच्या समृद्धीला बाधा आणते.डिजिटल युगातील भाषा ही पारंपरिक नियमांच्या चौकटीत न बसणारी 'लवचिक भाषा' बनली आहे. भाषेतील संक्षिप्तीकरण आणि अनौपचारिकता हा आधुनिक संवादाचा अविभाज्य भाग झाला आहे. परंतु ही लवचिकता दीर्घकालीन भाषिक स्थैर्यासाठी आव्हान ठरू शकते.भाषाशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता भाषा ही कायमता आणि बदल या दोन्हींच्या संगमावर टिकून राहते. समाज माध्यमांमुळे बदलाचा वेग वाढला आहे. म्हणून बदल स्वाभाविक असला तरी तो प्रमाणित आणि नियंत्रित असणे आवश्यक आहे.

**सुधारणा आणि शिफारसी:**

१. डिजिटल संवादात मातृभाषेचा शुद्ध, सृजनशील वापर करण्यासाठी युवकांना प्रोत्साहन देणे.
२. देवनागरी किंवा मातृभाषेच्या कीबोर्डचा वापर वाढवण्यासाठी तांत्रिक साधनांचा विकास.
३. शाळा–महाविद्यालयांत डिजिटल भाषिक साक्षरतेच्या कार्यशाळा.
४. सोशल मीडिया कंपन्यांनी स्थानिक भाषांसाठी चांगली टायपिंग साधने उपलब्ध करून देणे.
५. भाषाशास्त्रज्ञ, लेखक आणि तंत्रज्ञ यांच्या संयुक्त प्रयत्नातून भाषिक धोरणे ठरवणे.

**निष्कर्ष:**

समाज माध्यमे ही आजच्या काळातील संवादाची प्रमुख साधने असून त्यांचा भाषेवर झालेला प्रभाव अनिवार्य व व्यापक आहे. या प्रभावामुळे भाषा अधिक लोकाभिमुख, सर्जनशील आणि लवचिक बनली आहे. संवादाचे लोकशाहीकरण घडले आहे. परंतु याच प्रक्रियेमुळे भाषिक शुद्धतेचे नुकसान, इंग्रजी-मिश्र रचनांचा अतिरेक,

शुद्धलेखनातील त्रुटी आणि भाषिक संस्कृतीचे अवमूल्यन यांसारखी आव्हाने निर्माण झाली आहेत.भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती सांस्कृतिक वारसा आहे. म्हणूनच समाज माध्यमे आणि भाषा यांचा संबंध संतुलितठेवण्यासाठी सजग आणि जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहे. भविष्यात डिजिटल युगातील भाषा अधिक सक्षम, स्वच्छ आणि सृजनशील राखण्यासाठी तांत्रिक, सामाजिक आणि शैक्षणिक पातळीवर एकत्रित काम करणे ही काळाची गरज आहे.

**संदर्भ:**


१) डॉ. राजेंद्र पाटील ,'सोशल मीडिया: संकल्पना व परिणाम, प्रशांत पब्लिकेशन, पुणे, आवृत्ती २०१८

२) डॉ.संजय देशमुख, 'डिजिटल माध्यमे आणि समाज', प्रकाशन विद्या बुक्स, औरंगाबाद. आवृत्ती२०१७

३) प्रा.नीलिमा कुलकर्णी, 'नव माध्यम: सोशल मीडिया' साई प्रकाशन, कोल्हापूर. आवृत्ती २०१९

४) डॉ. अशोक कांबळे 'माध्यमे संस्कृती आणि समाज', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. आवृत्ती २०१६

५) डॉ. विलास पवार,' नव माध्यमे आणि युवक', डायमंड पब्लिकेशन, मुंबई. आवृत्ती २०१५

६) प्रा.सचिन जाधव, 'माध्यम शिक्षण आणि सोशल मीडिया ' यश पब्लिकेशन, पुणे .आवृत्ती २०१९

७) डॉ.कविता मोरे, 'सोशल नेटवर्किंग साइट्स: प्रभाव व आव्हाने 'अथर्व प्रकाशन नाशिक आवृत्ती २०२०